संत गाडगे बाबा
अमरावती विद्यापीठ
अमरावती- ४४४ ६०२
(महाराष्ट्र)

वेबसाईट : www.sgbau.ac.in
ई-मेल : reg@sgbau.ac.in

क्रमांक - संगाबाअवि/आ.क./ ९७ /२०२३.
दिनांक - २३ . ०२. २०२३

## सूचना

आचार्य पदवी करीता सत्र २०२१-२२ करीता प्रवेशित संशोधनकर्ता यांना फेलोशिप / शिष्यवृत्ती प्राप्त करण्याहेतु कळविण्यात येते की, आचार्य पदवीकरीता प्रवेश घेण्यासंदर्भात अध्यादेश क्र. १/२०१६ नुसार प्रवेशाची कार्यवाही ३१ डिसेंबर, २०२१ पर्यंत करण्याबाबत संशोधन केंद्रांना कळविण्यात आले होते. त्याच दरम्यान MPET-2021 परीक्षेचा निकाल दिनांक ०५.०१.२०२२ ला जाहीर करण्यात आला. त्यास अनुसरुन विविध संघटनांकडून प्रवेशाची दिनांक वाढवून देण्याबाबत निवेदने प्राप्त झालीत. त्यानुसार १० जुलै २०२२ पर्यंत विद्यार्थ्यांचे प्रवेश करण्याबाबत कळविण्यात आले होते. तसेच Ph.D. Course Work ची परीक्षा डिसेंबर, २०२२ ला आयोजित करण्यात आली त्यासंदर्भात सुद्धा संघटनांचे प्राप्त निवेदनानुसार परीक्षेची दिनांक वाढवून दिनांक ०८.०१.२०२३ ला परीक्षा आयोजित करण्यात आली. त्याचा निकाल हा दिनांक २३.०२.२०२३ रोजी घेषित करण्यात आलेला आहे. तसेच दिनांक ३१.०८.२०२२ ला प्राधिकारणाचा कालावधी संपुष्टात आल्यामुळे सद्यस्थितीत आरआरसी गठनाची प्रक्रीया सुरु आहे.

पीएच.डी.कोर्स वर्क – २०२२ निकालामध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांची आर.आर.सी. प्रक्रीया पूर्ण करुन अध्यादेश क्र. १/२०१६ मधील तरतुदीनुसार सदरहू विद्यार्थ्यांना आरआरसी मुल्यमापनानुसार १ सप्टेंबर, २०२२ पासून नोंदणी क्रमांक देण्यात येईल. याची कृपया नोंद घ्यावी.

सहा. कुलसचिव (आचार्य कक्ष)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ